सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोन वेळा सन्मानित
मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे 'स्वच्छ कॅम्पस रँकिंग 2019' मानांकन प्राप्त

ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)

'ज्ञानगंगोत्री', गोवर्धन, गंगापूर धरणाजवळ, नाशिक - 422 222

वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा

बी.कॉम. शिक्षणक्रम (G02) : द्वितीय वर्ष प्रवेश माहितीपुस्तिका

शैक्षणिक वर्ष : जानेवारी तुकडी २०२६

बी. कॉम. शिक्षणक्रम : माहितीपुस्तिका

शिक्षणक्रम संकेतांक (Programme Code) : GO2

अनुक्रमणिका

१. विद्याशाखेचा परिचय ४
२. शिक्षणक्रमाविषयी ४
   २.१ शिक्षणक्रमाची संरचना
   २.२ अध्ययनपद्धती
   २.३ कालावधी
   २.४ माध्यम
   २.५ श्रेयांक
३. द्वितीय वर्ष बी.कॉम.. ..... ६
   ३.१ अभ्यासक्रम
   ३.२ प्रवेश पात्रता
   ३.३ शिक्षणक्रम शुल्क
   ३.४ थेट द्वितीय वर्ष प्रवेशाबाबत
   ३.५ थेट द्वितीय वर्ष शुल्काबाबत
४. तृतीय वर्ष बी.कॉम. १०
   ४.१ अभ्यासक्रम
   ४.२ प्रवेश पात्रता
   ४.३ शिक्षणक्रम शुल्क
   ४.४ मूल्यमापन प्रक्रिया (द्वितीय व तृतीय वर्ष)
५. Academic Bank of Credits ID तयार करण्याबाबतची सूचना १३
६. नोंदणी प्रक्रिया १३
७. सायबर सुरक्षा अभ्यासक्रम (अनिवार्य ऑडीट कोर्स) १३
८. विभागीय केंद्रे १४
९. विशेष सूचना/संपर्कासाठी १४
   परिशिष्टे १६
   परिशिष्ट १ : Online Admission Process flow for Candidate NOT having 16 Digit P.R.N.
   Online Admission Process flow for Candidate who have16 Digit P.R.N.
   परिशिष्ट २ : उमेदवार/अध्ययनार्थी करारनामा
   Candidate/Student Agreement at the time of Admission
   परिशिष्ट ३ : गरीब विद्यार्थी सहाय्य योजना नियमावली
   परिशिष्ट ४ : University Grants Commission Resolution (2004)
   परिशिष्ट ५ : G.R. of Equivalency for 10th and 12th
   परिशिष्ट ६ : एकापेक्षा अधिक शिक्षणक्रमांना प्रवेश
   परिशिष्ट ७ : G.R. of Equivalency
   परिशिष्ट ८ : Letter of Recognition from UGC
   परिशिष्ट ९ : विद्यार्थी सहायता आणि विद्यार्थी कल्याण योजना
   परिशिष्ट १० : Student Corner

विद्यापीठ गीत



एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना ।
चिरंतन ज्ञानाची साधना ।
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ।। धृ ।।

ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी ।
तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी ।
ज्ञानच देउळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ।। १ ।।

नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे ।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे ।
मुक्त करिल तो परंपरेच्या बंदिघरातुन मना ।। २ ।।

हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे ।
न्यायनीतीचे पाऊल जेथे भेदाशी ना अडे ।
जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ।। ३ ।।

कुसुमाग्रज

निर्मिती

श्री. विलास बधान
प्रमुख (प्र.), ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

© २०२६, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

- **प्रथम प्रकाशन** : जानेवारी २०२६
- **प्रकाशक** : डॉ. गोविंद कतलाकुटे, कुलसचिव (प्र.), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

AC-26-11/Shardul

1. विद्याशाखेचा परिचय

मुक्त विद्यापीठाच्या स्थापनेपासून वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा यशस्वीरित्या कार्यरत आहे. सध्या विद्याशाखेत एक पदवी शिक्षणक्रम, तीन पदविका शिक्षणक्रम आणि दोन पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम एम.कॉम व एम.बी.ए. (AICTE मान्यताप्राप्त) राबविले जातात.

उद्दिष्टे

1. सहकार, व्यापार-उद्योग, व्यवस्थापनशास्त्र, इत्यादी क्षेत्रांतील ज्ञानव्यवहाराची जाणकारी प्राप्त करून बहुश्रुतता वाढविणे.
2. कार्यालये, संस्था, कंपन्यांमध्ये प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून देणे.
3. विद्यार्थ्यांना सातत्याने होणाऱ्या सुधारणा व बदलांतील एक सक्षम घटक बनविणे.
4. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकास गुण वृद्धिंगत करणे.
5. संशोधन कार्यातून वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र प्रगल्भ करणे.
6. शैक्षणिक शिक्षणक्रम व प्रसिद्धीच्या माध्यमातून ज्ञान सर्वदूर पसरविणे.
7. व्यवस्थापक होऊ इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनाच्या नवीन संधी उपलब्ध करून देणे.
8. समृद्ध जीवन जगण्यासाठी ज्ञानात्मक आधार देणे.

2. शिक्षणक्रमाविषयी

बी.कॉम. पदवी परीक्षेचा शिक्षणक्रम एकूण 108 श्रेयांकांचा आहे. हा शिक्षणक्रम प्रत्येकी 100 गुणांच्या 18 अभ्यासक्रमांमध्ये विभागण्यात आला आहे. दरवर्षी 6 अभ्यासक्रम याप्रमाणे 3 वर्षांत एकूण 18 अभ्यासक्रम अभ्यासावयाचे आहेत.

2.1 शिक्षणक्रमाची संरचना

बी. कॉम. पदवी शिक्षणक्रमातील अभ्यासक्रमांची मांडणी पुढील तीन गटांत करण्यात आली आहे.

वर्ष	*अभ्यासक्रम*	*श्रेयांक*
प्रथम	अधिष्ठान / सक्तीचे	36
द्वितीय	ऐच्छिक / सक्तीचे	36
तृतीय	वैकल्पिक / विशेषीकरण	36
	एकूण	108

या तीन वर्षांच्या पदवी शिक्षणक्रमात पहिल्या वर्षी 36, दुसऱ्या वर्षी 36 आणि तिसऱ्या वर्षी 36 श्रेयांकांचे अभ्यासक्रम आहेत. सर्व अभ्यासक्रम पूर्ण करणे विद्यार्थ्यास बंधनकारक आहे.

द्वितीय वर्ष (प्रत्येक अभ्यासक्रम – 6 श्रेयांक)

(अ) सक्तीचे (पाच पेपर्स) अभ्यासक्रम	*संपर्कसत्रे*
(1) (COM 208) हिशेबशास्त्र-1	9
(2) (ECO 201) व्यवसायिक अर्थशास्त्र	9
(3) (COM 210) व्यावसायिक कायदे	9
(4) (MGM 105) व्यवस्थापनशास्त्र	9
(5) (COM 212) व्यवसाय संघटन व प्रशासन	9
(आ) वैकल्पिक (एक पेपर)	
(1) (MGM 224) व्यवस्थापकीय अर्थशास्त्र *किंवा*	9
(2) (MGM 225) व्यवसाय संज्ञापन	9
(इ) ऑडिट कोर्स	
(1) (EVS 201) पर्यावरण अभ्यास	
(2) (CSC 102) सायबर सिक्युरिटी अभ्यासक्रम – ऑडिट कोर्स – अनिवार्य (कृपया मुद्दा क्र.7 पहा)	

सूचना : सायबर सिक्युरिटी (CSC102) हा अनिवार्य ऑडीट अभ्यासक्रम ऑनलाईन असून त्याची परीक्षासुद्धा ऑनलाईन असेल. सदर अभ्यासक्रमाचे गुण श्रेयांक/शिक्षणक्रमाची श्रेणी ठरविताना ग्राह्य धरले जाणार नाहीत.

तृतीय वर्ष (प्रत्येक अभ्यासक्रम 6 श्रेयांक)

(अ) सक्तीचे (चार पेपर्स) – अभ्यासक्रम	*संपर्कसत्रे*
(1) (COM 209) हिशेबशास्त्र-2	9
(2) (COM 220) भारतीय आर्थिक पर्यावरण	9
(3) (COM 221) परिव्यय अंकेक्षण आणि करआकारणी	9
(4) (COM 222) मानव संसाधन व्यवस्थापन	9
(आ) विशेषीकरण कोणताही एक विषय (दोन पेपर्स)	
(1) (COM 306) बँकिंग व फायनान्स – 1	9
(2) (COM 307) बँकिंग व फायनान्स – 2	9
किंवा	
(3) (MGM 308) विपणन व्यवस्थापन – 1	
(4) (MGM 309) विपणन व्यवस्थापन – 2	9

महत्त्वाचे :

(1) पदवी द्वितीय व तृतीय वर्षाच्या गुणांवर दिली जाईल.

(2) तृतीय वर्षास 'विशेषीकरण' गटातून एका विषयाचे दोन पेपर्स घ्यावयाचे आहेत. द्वितीय वर्षास 'वैकल्पिक' (Elective) गटातून एक पेपर निवडायचा आहे.

2.2 अध्ययन पद्धती

ज्या विद्यार्थ्यांना दररोज महाविद्यालयात जाऊन शिक्षण घेता येत नाही; तसेच अध्ययन करण्यासाठी पूर्ण वेळ देता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी मुक्त विद्यापीठाने स्वतंत्रपणे अध्ययन पद्धती विकसित केली आहे. त्यात पुढील घटकांचा समावेश आहे.

(1) स्वयं-अध्ययनाधिष्ठित पाठ्यपुस्तके.
(2) तज्ज्ञ प्राध्यापकांचे संपर्कसत्रात मार्गदर्शन.
(3) अध्ययन कालांतर्गत मूल्यमापनाची सोय.
(4) आवश्यक तेथे प्रात्यक्षिकांची संधी.
(5) आभासी वर्गाची (Virtual Class Room) वेब रेडिओ 'यशवाणी' उपलब्धता.

या अध्ययन पद्धतीत विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रमाचा तपशील न देता, त्यावरील अध्ययन साहित्य विद्यापीठाच्या ycmou.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर pdf स्वरूपात उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी याचा वापर करावा. पुस्तकांचा संचही देण्यात येतो. प्रवेश शुल्कातच ही अध्ययन पुस्तके देण्यात येतात व ती विद्यार्थ्याला स्वतःकडे कायम ठेवता येतात. ही स्वयं-अध्ययन पुस्तके अन्य पाठ्यपुस्तकांपेक्षा निराळ्या पद्धतीने लिहिलेली असतात. ह्या पाठ्यपुस्तकात एका वाचनात समजावून घेता येईल अशा प्रकारे विषयांची छोट्या छोट्या घटकांत विभागणी केलेली असते. उदाहरणार्थ, उदाहरणे, आलेख, चित्रे, इत्यादींच्या साहाय्याने विषयांची मांडणी सुबोधपणे करण्यात येते. ह्या पुस्तकांची छपाई विद्यार्थ्यांचे अध्ययन सुलभपणे व्हावे या दृष्टीने करण्यात आलेली असते. पाठ्यांशाखाली काही प्रश्न दिलेले असतात, तो तो भाग वाचून झाल्यावर हे प्रश्न विद्यार्थ्याने सोडविल्यास तो भाग आपल्याला कितपत समजला ह्याचा त्याला स्वतःलाच पडताळा घेता येतो. जर त्याला काही प्रश्न सोडविता आले नाहीत, तर त्याने तो भाग पुन्हा वाचून उत्तरे मिळवावयाची असतात. एवढे करूनही काही प्रश्नांची उत्तरे मिळू शकले नाहीत तर ते प्रश्न नोंदवून ठेवावेत व अभ्यासकेंद्रावरील संपर्कसत्रात मार्गदर्शक प्राध्यापकांशी (संमंत्रक - Counsellor) चर्चा करून त्याची उत्तरे मिळविता येतात.

विद्यार्थ्याला आपल्या सोईच्या ठिकाणचे अभ्यासकेंद्र निवडता येते. या अभ्यासकेंद्रावर प्रत्येक अभ्यासक्रमासाठी सामान्यतः सुटीच्या दिवशी वा कार्यालयीन वेळेनंतर संपर्कसत्रे घेण्यात येतात. त्या त्या विषयातील तज्ज्ञ मार्गदर्शक ह्या संपर्कसत्रात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. मात्र हे मार्गदर्शन केवळ व्याख्यानांच्या स्वरूपाचे असत नाही. मार्गदर्शकाकडून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची/शंकांची उत्तरे मिळविणे, कठीण विषयावर चर्चा-परिसंवाद घडवून आणणे, अंतर्गत मूल्यमापनाच्या माध्यमांतून आपल्या प्रगतीविषयी विद्यार्थ्याला माहिती घेता येते. म्हणून संपर्कसत्रांना विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे.

विद्यार्थ्याने वरील सर्व अध्ययन सुविधांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेऊन स्वतःची अभ्यासपद्धती तयार करावी. आपल्याला मिळणारा वेळ लक्षात घेऊन मिळणाऱ्या वेळेचा नियोजनपूर्वक उपयोग करावा. केवळ पाठांतराद्वारे केलेला अभ्यास हा खरा अभ्यास नसून विषयाचे सुस्पष्ट आकलन होणे व त्याचा योग्य ठिकाणी उपयोग करता येणे हे चांगल्या अभ्यासपद्धतीचे मर्म आहे. त्यामुळे प्रात्यक्षिके व सराव यांवर भर देऊन विद्यार्थ्याने अभ्यास करावा अशी अपेक्षा आहे.

2.3 कालावधी

मुक्त शिक्षणपद्धतीत विद्यार्थी काम करताकरता शिक्षण घेत असल्यामुळे अध्ययन-कालावधीबाबत लवचीक धोरण ठेवण्यात आले आहे. त्यामुळे एका वर्षात करावयाचा अभ्यास विद्यार्थी आपल्या सोईने ते वर्ष संपल्यानंतरही करू शकतो. म्हणून हा पदवी शिक्षणक्रम तीन वर्षांचा असला तरी विद्यार्थ्यांस तो आपल्या सोईने सहा वर्षांपर्यंत पूर्ण करण्याची मुभा देण्यात आली आहे. अभ्यास पूर्ण झाल्याची खात्री झाल्यावर परीक्षा देता येण्याची स्वायत्तता विद्यार्थ्याला देण्यात आली आहे. वर्षअखेरीस होणारी परीक्षा अभ्यास पूर्ण झालेला नसल्यास त्याच वेळी देण्याची सक्ती नाही, तसेच वर्षातून दोन वेळा परीक्षेची संधी उपलब्ध असल्याने विद्यार्थी आपल्या सोईने योग्य वेळी परीक्षा देऊ शकतो. समजा आपण प्रथम किंवा द्वितीय वर्षाची अंतिम परीक्षा दिली परंतु एकही अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करू शकला नाहीत (म्हणजे 40% गुण) तरी आपणांस द्वितीय /तृतीय वर्षात प्रवेश दिला जाईल. मात्र पहिल्या / दुसऱ्या वर्षाच्या अभ्यासक्रमांची अंतिम परीक्षा पुढे द्यावी लागेल. ह्या लवचीक पद्धतीचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा व प्रवेश मुदतीत घ्यावा.

2.4 माध्यम

इंग्रजीच्या अभ्यासक्रमाखेरीज इतर सर्व अभ्यासक्रमांसाठी मराठी माध्यम राहील. इंग्रजीखेरीज इतर सर्व अभ्यासक्रमांची पाठ्यपुस्तके, अभ्यासक्रमांचे मार्गदर्शन, गृहपाठ व अंतिम परीक्षेच्या प्रश्नपत्रिका मराठी भाषेतूनच राहतील. मात्र प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी मराठी किंवा इंग्रजी भाषेचा वापर करण्याचे स्वातंत्र्य राहील.

2.5 श्रेयांक

सामान्यतः एका अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याला 30 ते 35 घड्याळी तासांचा वेळ लागतो. मुक्त शिक्षणपद्धतीत या अध्ययनतासांचे मापन 'श्रेयांका'च्या परिमाणात केले जाते. 30 ते 35 अध्ययनतासांचा अभ्यास म्हणजे 1 श्रेयांक. या अभ्यासात अध्ययन पुस्तकांचे वाचन, टिपणे काढणे, मनन-चिंतन करणे, प्रश्नोत्तरे लिहिणे, संपर्कसत्रातील मार्गदर्शन, इत्यादींचा समावेश आहे.

सामान्यतः सहा श्रेयांकांचा म्हणजेच 180 ते 200 अध्ययन तासांचा एक अभ्यासक्रम असतो. पदवी परीक्षेसाठी एकूण 108 श्रेयांकांचा अभ्यास पूर्ण करावा लागतो.

३. द्वितीय वर्ष बी. कॉम.

3.1 अभ्यासक्रम

पुनर्रचित अभ्यासक्रम जून 2000 पासून सुरू करण्यात आला आहे. यात प्रथम वर्षास सक्तीचा 36 श्रेयांकांचा अधिष्ठान अभ्यासक्रम देण्यात आला आहे. 6 श्रेयांकांचा 1, याप्रमाणे 6 अभ्यासक्रम प्रथम वर्षास आहेत. द्वितीय वर्ष बी.कॉम. वर्गाचा पुनर्रचित अभ्यासक्रम जून 2001 पासून सुरू करण्यात आला आहे आणि तृतीय वर्ष बी.कॉम.चा अभ्यासक्रम जून 2003 पासून सुरू करण्यात आलेला आहे. पुनर्रचित द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमात 5 अनिवार्य व 1 वैकल्पिक अभ्यासक्रम आहे. तर तृतीय वर्ष बी.कॉम.साठी 4 अनिवार्य आणि विशेषीकरणाच्या एका विषयाचे दोन अभ्यासक्रम आहेत. त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे.

द्वितीय वर्ष बी.कॉम.	*संपर्कसत्रे*
(अ) अनिवार्य/सक्तीचे	
(1) (COM 208) हिशेबशास्त्र - भाग एक	12
(2) (ECO 201) व्यवसाय अर्थशास्त्र	09
(3) (COM 210) व्यावसायिक कायदे	09
(4) (MGM 105) व्यवस्थापन शास्त्र	09
(5) (COM 212) व्यवसाय संघटन व प्रशासन	09
(आ) वैकल्पिक/ऐच्छिक (कोणताही एक)	
(1) (MGM 224) व्यवस्थापकीय अर्थशास्त्र	09
किंवा	
(2) (MGM 225) व्यवसाय संज्ञापन	09
(इ) (EVS 201) ऑडिट कोर्स - पर्यावरण अभ्यास	--
(ई) (CSC 102) सायबर सिक्युरिटी अभ्यासक्रम - ऑडिट कोर्स - अनिवार्य (कृपया मुद्दा क्र.7 पहा)	

विशेष सूचना

(1) द्वितीय वर्ष बी.कॉम. साठी प्रवेश-अर्ज भरताना माहिती-पुस्तिकेतील अभ्यासक्रमात (√) अशी खूण करावी. तसेच प्रवेश-अर्जात विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम संकेतांक व विषयाचे नाव लिहावे.

(2) ऑडिट कोर्स EVS 201 करिताचे अध्ययन साहित्य विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्याचा वापर विद्यार्थ्यांनी करावा. या कोर्सचे छापील साहित्य उपलब्ध होणार नाही, याची नोंद घ्यावी.

द्वितीय वर्ष बी.कॉम. : अभ्यासक्रम

(COM 208) हिशेबशास्त्र - भाग एक

पुस्तक पहिले : बँक जुळवणी पत्रक, व्यापारी विपत्रे आणि घसारा

घटक 1 : बँक जुळवणी पत्रक

घटक 2 : व्यापारी विपत्रे : हुंड्यांचे व्यवहार

घटक 3 : घसारा

पुस्तक दुसरे : भागीदारी लेखे

घटक 4 : भागीदारी

घटक 5 : (अ) : भागीदारीचे अंतिम लेखे (भागीदारीची तेरीज)

(आ) : भागीदारीचे अंतिम लेखे (विविध दुरुस्त्या, तरतुदी किंवा समायोजन)

(इ) : भागीदारी : उत्पादन खाते, व्यापार खाते, नफातोटा खाते आणि ताळेबंद

पुस्तक तिसरे : भागीदारी व अव्यापारी संस्थांचे लेखे

घटक 6 : भागीदाराचा प्रवेशलेखे

घटक 7 : भागीदाराची निवृत्ती

घटक 8 : भागीदारीचे विसर्जन

घटक 9 : अव्यापारी संस्थांचे लेखे

(ECO 201) व्यवसाय अर्थशास्त्र

पुस्तक पहिले : व्यवसाय-संस्था व मागणीचे विश्लेषण

भाग-1

घटक 1 : (अ) : काही मूलभूत संकल्पना : संयंत्र, व्यवसाय-संस्था व उद्योग

(आ) : व्यवसाय-संस्थेची उद्दिष्टे

(इ) : व्यवसाय-संस्थेच्या निर्णय-प्रक्रियेवर प्रभाव पाडणारे घटक

घटक 2 : (अ) : व्यवसाय-संस्थेचे आकारमान : मापन व निर्धारण

(आ) : लघुउद्योग : स्वरूप, महत्त्व आणि समस्या

भाग-2

घटक 1 : (अ) : मागणी : संकल्पना आणि स्वरूप

(आ) : मागणीतील बदल आणि मागणी सिद्धान्त

घटक 2 : मागणीची लवचीकता

घटक 3 : भविष्यकालीन मागणीचे पूर्वानुमान

पुस्तक दुसरे : पुरवठा व बाजारातील परिस्थिती

भाग-1

घटक 1 : उत्पादन परिव्यय

घटक 2 : (अ) : उत्पादन परिव्यय आणि उत्पादन

(आ) : 'ना नफा, ना तोटा' उत्पादन बिंदू

घटक 3 : पुरवठ्याची लवचीकता

भाग-2

घटक 1 : (अ) : मूलभूत संकल्पना

(आ) : पूर्ण स्पर्धेतील किंमत निर्धारण

घटक 2 : (अ) : एकाधिकार

(आ) : एकाधिकारयुक्त स्पर्धा

घटक 3 : (अ) : अल्पजनाधिकार

(आ) : किंमत निर्धारणाच्या पद्धती

पुस्तक तिसरे : श्रमबाजार व भांडवल गुंतवणूक

भाग-1

घटक 1 : पूर्ण आणि अपूर्ण स्पर्धा

घटक 2 : वेतन निर्धारण पद्धती

घटक 3 : कामगार संघ

घटक 4 : औद्योगिक विवाद

भाग-2

घटक 1 : (अ) : भांडवल संकल्पनेचा अधिक परिचय

(आ) : भांडवलाच्या मागणीचे विवेचन : नवी गुंतवणूक व पुनःप्रस्थापन

(इ) : व्याजाचे दर आणि गुंतवणुकीसाठी मागणी

(ई) : धोका, अनिश्चितता आणि गुंतवणूकविषयक निर्णय

घटक 2 : (अ) : अंतर्गत आणि बाह्य स्रोत

(आ) : भांडवलबाजार

(इ) : भांडवलपुरवठा करणाऱ्या महत्त्वाच्या संस्था

(COM 210) व्यावसायिक कायदे

पुस्तक पहिले : भारतीय करार व चलनक्षम दस्तऐवज कायदा

घटक 1 : भारतीय करार कायदा 1872 : भाग – 1

घटक 2 : भारतीय करार कायदा 1872 : भाग – 2

घटक 3 : चलनक्षम दस्तऐवज कायदा 1881 : भाग –1

घटक 4 : चलनक्षम दस्तऐवज कायदा 1881 : भाग –2

पुस्तक दुसरे : मालविक्री व कारखाना कायदा

घटक 5 : मालविक्री कायदा 1930 – भाग 1

घटक 6 : मालविक्री कायदा 1930 – भाग 2

घटक 7 : कारखाना कायदा 1948 – भाग 1

घटक 8 : कारखाना कायदा 1948 – भाग 2

पुस्तक तिसरे : औद्योगिक कलह व वेतन कायदा

घटक 9 : औद्योगिक कलह कायदा 1947

घटक 10 : ग्राहक संरक्षण कायदा 1986

घटक 11 : वेतन देण्याचा कायदा 1936

घटक 12 : किमान वेतन कायदा 1948

(MGM 105) व्यवस्थापनशास्त्र

पुस्तक पहिले : व्यवस्थापन व त्याचे स्वरूप

घटक 1 : व्यवस्थापन : अर्थ, महत्त्व, आवश्यकता व वैशिष्ट्ये आणि व्याप्ती

घटक 2 : व्यवस्थापकीय विचारांचा अभ्यास

घटक 3 : व्यवस्थापनाची जबाबदारी आणि स्तर

पुस्तक दुसरे : व्यवस्थापन : विकास व कार्ये

घटक 4 : व्यवस्थापन विकास

घटक 5 : व्यवस्थापकीय कार्ये : नियोजन

घटक 6 : व्यवस्थापकीय कार्ये : निर्णय

पुस्तक तिसरे : व्यवस्थापकीय कार्ये

घटक 7 : व्यवस्थापकीय कार्ये : संघटन

घटक 8 : व्यवस्थापकीय कार्ये : संचलन आणि सुसूत्रीकरण

घटक 9 : व्यवस्थापकीय कार्ये : अभिप्रेरक व नियंत्रण

(COM 212) व्यवसाय संघटन व प्रशासन

पुस्तक पहिले : औद्योगिक संघटन, उद्योगाचे स्थानिकीकरण व लघुउद्योग

भाग 1

घटक 1 : औद्योगिक संघटन – प्रकार

घटक 2 : औद्योगिकरणाची प्रक्रिया व ती ठरविणारे घटक

घटक 3 : औद्योगिकरणाची वाटचाल व प्रादेशिक असमतोल

भाग 2

घटक 1 : स्थानिकीकरण

घटक 2 : विकेंद्रीकरण

घटक 3 : लघुउद्योग : महत्त्व

घटक 4 : लघुउद्योग : धोरण

पुस्तक दुसरे : उद्योग : आकार, संयोग व भांडवल

भाग 1

घटक 1 : उद्योग आकार

घटक 2 : भारतातील औद्योगिक संयोग

भाग 2

घटक 1 : औद्योगिक भांडवल व त्याचे नियोजन

घटक 2 : चालू भांडवल व स्थिर भांडवल

घटक 3 : भांडवल उभारण्याच्या विविध पद्धती

घटक 4 : भांडवल पुरविणाऱ्या विविध संस्था

पुस्तक तिसरे : उद्योग संबंध व व्यवस्थापन

भाग 1

घटक 1 : भारतातील औद्योगिक संबंध

घटक 2 : शास्त्रीय व्यवस्थापन

घटक 3 : विवेकीकरण

भाग 2

घटक 1 : कर्मचारी व्यवस्थापन

घटक 2 : विपणन व्यवस्थापन

घटक 3 : वित्तीय व्यवस्थापन

घटक 4 : उत्पादन व्यवस्थापन

(MGM 224) व्यवस्थापकीय अर्थशास्त्र

पुस्तक पहिले : व्यवस्थापकीय अर्थशास्त्रः स्वरूप व संकल्पना

घटक 1 (अ) : व्यवस्थापकीय अर्थशास्त्र : स्वरूप, उद्दिष्टे व व्याप्ती
(आ) : आर्थिक विश्लेषण
(इ) : आर्थिक विश्लेषणाच्या पद्धती
(ई) : मूलभूत संकल्पना

घटक 2 (अ) : व्यवस्थापनविषयक निर्णयांचे स्वरूप
(आ) : व्यवस्थापकीय अर्थशास्त्राची अभ्यासपद्धती
(इ) : काही मूलभूत संकल्पना : संयंत्र, व्यवसाय संस्था व उद्योग
(ई) : व्यवसाय संस्थेचे आकार
(उ) : व्यावसायिक निर्णय

घटक 3 : मागणीची संकल्पना

घटक 4 : मागणीचे विश्लेषण

घटक 5 : मागणीची लवचीकता आणि अंदाज

घटक 6 : मागणीचे पूर्वानुमान

पुस्तक दुसरे : बाजार आणि किंमत निर्धारण

घटक 7 : उत्पादन परिव्यय : संकल्पना, प्रकार आणि वक्र

घटक 8 : उत्पादन फल

घटक 9 : 'ना नफा, ना तोटा' उत्पादन बिंदू

घटक 10 : पुरवठा

घटक 11 : बाजारातील परिस्थिती आणि किंमत-उत्पादन निर्णय

घटक 12 : बाजार संरचनेचे विश्लेषण (1)

घटक 13 : बाजार संरचनेचे विश्लेषण (2)

घटक 14 : किंमत निर्धारणाची तत्त्वे आणि व्यूह

पुस्तक तिसरे : व्यवसायसंस्थेचे सिद्धान्त व गुंतवणूक विश्लेषण

घटक 15 : व्यवसायसंस्था : मूलभूत दृष्टिकोन

घटक 16 : व्यवसायसंस्थेचा वर्तणुकीचा सिद्धांत

घटक 17 : व्यवसायसंस्थेचे व्यवस्थापकीय सिद्धांत

घटक 18 : नफा : संकल्पना व विश्लेषण

घटक 19 : भांडवलाचे अर्थसंकल्पन

घटक 20 : जोखीम, निश्चितता व अनिश्चितता

घटक 21 : सरकारी गुंतवणुकीचे निर्णय

(MGM 225) व्यवसाय संज्ञापन

पुस्तक पहिले : संज्ञापनाची मूलतत्त्वे व माध्यमे

घटक 1 : संदेशप्रक्रिया

घटक 2 : संज्ञापनाची तत्त्वे

घटक 3 : संज्ञापनाची विभिन्न माध्यमे

घटक 4 : संज्ञापनाच्या आधुनिक पद्धती व साधने

पुस्तक दुसरे : लेखी व तोंडी संज्ञापन

घटक 5 : (अ) : लेखी संज्ञापनाचे महत्त्व व प्रकार
(आ) : पत्रलेखनाचे प्रकार
(इ) : अहवाल

घटक 6 : तोंडी संज्ञापन

पुस्तक तिसरे : प्रभावी संज्ञापन आणि मानवी संबंध

घटक 7 : संज्ञापनातील अडथळे

घटक 8 : प्रभावी संज्ञापन

घटक 9 : संज्ञापन आणि मानवी संबंध

घटक 10 : व्यवस्थापकीय कार्यक्षमतेत संज्ञापनाचे महत्त्व

ऑडिट कोर्स

पुस्तक 1 : पर्यावरण अभ्यास

पर्यावरण अभ्यास हा अभ्यासक्रम 4 श्रेयांकांचा असून विद्यार्थ्यांस ऑडिट कोर्स म्हणून घेणे अनिवार्य आहे. सदर अभ्यासक्रमाचे स्वतंत्र पुस्तक देण्यात येईल.

या विषयात किमान 'C' श्रेणी मिळवावी लागेल.

3.2 प्रवेश पात्रता

खालीलपैकी कोणतीही एक पात्रता पूर्ण असणाऱ्या व्यक्ती –

(1) य.च.म.मुक्त विद्यापीठात यापूर्वी प्रथम वर्ष बी.कॉम.ला प्रवेश घेतलेले सर्व विद्यार्थी.

(2) 12वी उत्तीर्णतेनंतर शासनमान्य व मान्यताप्राप्त विद्यापीठातील बी.कॉम. विद्याशाखेतील प्रथम वर्ष पदवी परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या सरळ प्रवेशाच्या नियमानुसार द्वितीय वर्षास प्रवेश मिळेल; म्हणजेच मुक्त विद्यापीठाच्या पहिल्या वर्षाच्या सर्व विषयांची (36 श्रेयांकांचे 6 अभ्यासक्रम) त्यास सूट देण्यात येईल. अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश-अर्जावर सरळ प्रवेश असे स्पष्ट लिहावे आणि प्रथम वर्ष पदवी उत्तीर्ण असल्याची संबंधित विद्यापीठाच्या गुणपत्रकाची प्रमाणित फोटोप्रत जोडणे आवश्यक आहे.

(3) थेट तृतीय वर्ष बी.कॉम. ला प्रवेश दिला जात नाही.

3.3 शिक्षणक्रम शुल्क

द्वितीय वर्ष एकूण शिक्षणक्रम शुल्क रु. 4098/- (चार हजार अठ्याऐंशव मात्र) आहे. त्याची वर्गवारी पुढीलप्रमाणे –

विद्यापीठ शुल्क अभ्यासकेंद्र शुल्क	रु. 3418=00 रु. 680=00
एकूण शिक्षणक्रम शुल्क	रु. 4098=00

(अ) संवैधानिक शुल्क (Mandatory Fees)

अ.क्र.	शुल्काचे शीर्षक	शुल्क (रु.)
1.	नोंदणी शुल्क	200=00
2	माहितीपुस्तिका शुल्क	50=00
3.	ई-सुविधा / ई -सर्विसेस शुल्क	70=00
4.	कुलपती ऑफीस इव्हेण्ट शुल्क	38=00
5.	स्पोर्ट शुल्क	50=00
6.	डी एसडब्लू शुल्क	50=00
7.	आपत्ती व्यवस्थापन शुल्क	10=00
8.	ग्रंथालय शुल्क	10=00
9.	एन. एस. एस. शुल्क	10=00
10.	संवाद शुल्क	10=00
11.	विद्यार्थी विमा शुल्क	20=00
	एकुण शुल्क	518=00

(ब) द्वितीय वर्ष शुल्क

शिक्षण शुल्क (Tution Fees)	2300=00
परीक्षा शुल्क	1280=00
संवैधानिक शुल्क	518=00
एकूण शुल्क रुपये	4098=00

शुल्क भरण्यासंबंधी सूचना –

विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्रावर कोणतेही शुल्क जमा करावयाचे नाही. एकूण शिक्षणक्रम शुल्क रु. 4098/- विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने विद्यापीठाच्या अधिकृत बँक खात्यात जमा करावयाचे आहे. ऑनलाईन पद्धतीशिवाय अन्य कोणत्याही पद्धतीने रक्कम स्वीकारली जाणार नाही.

३.४ थेट द्वितीय वर्ष प्रवेशाबाबत

थेट प्रवेश नियमानुसार प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी पूर्वी पूर्ण केलेल्या शैक्षणिक कार्याचे मूल्य लक्षात घेऊन त्यांना या विद्यापीठाचा पदवी शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी काही श्रेयांकांची सूट देण्यात येते. याबाबतचा नियम खालीलप्रमाणे आहे.

(1) **द्वितीय वर्ष बी.कॉम. प्रवेशाबाबत :** इतर मान्यताप्राप्त विद्यापीठातील प्रथम वर्ष बी.कॉम. उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना द्वितीय वर्ष बी.कॉम.ला प्रवेश घेता येईल.

(2) तृतीय वर्ष बी.कॉम. ला थेट / सरळ प्रवेश दिला जात नाही.

(अ) थेट प्रवेश-अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे

(1) जन्मतारखेचा पुरावा (प्राथमिक / माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळा सोडल्याचा दाखला अथवा प्रमाणपत्र) सत्यप्रत (Attested photo copy)

(2) अभ्यासकेंद्रावर प्रवेश-अर्ज जमा करतेवळी आपण मूळ गुणपत्रके व मूळ जन्मदाखला आणि त्याच्या झेरॉक्स प्रती अभ्यासकेंद्रात घेऊन जाव्यात. केंद्रप्रमुख किंवा केंद्रसंयोजक मूळ प्रतींवरून फोटो प्रत प्रमाणित करून सही-शिक्का करतील. त्याचवेळी आपण मूळ प्रती परत घेऊन जा. मूळप्रती सांभाळण्याची जबाबदारी अभ्यासकेंद्र किंवा विद्यापीठ मुख्यालयावर राहणार नाही. केंद्रप्रमुख किंवा केंद्रसंयोजक विद्यार्थ्यांच्या अर्जाला प्रमाणित सत्यप्रती जोडतील. त्या गहाळ होणार नाहीत याची काळजी घेण्यात येईल.

माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचल्यानंतरच प्रवेश-अर्ज भरावा. त्यासोबत वर उल्लेखिलेली कागदपत्रे आणि प्रवेशशुल्काची पूर्ण रक्कम विद्यापीठाच्या विहित पद्धतीनेच भरावी.

3.5 थेट द्वितीय वर्ष शुल्काबाबत

थेट द्वितीय वर्ष एकूण शिक्षणक्रम शुल्क रु. 5708/- (पाच हजार सातशे आठ मात्र) आहे. त्याची वर्गवारी पुढीलप्रमाणे-

विद्यापीठ शुल्क	रु. 5028=00
अभ्यासकेंद्र शुल्क	रु. 680=00
एकूण शिक्षणक्रम शुल्क	रु. 5708=00

(अ) संवैधानिक शुल्क (Mandatory Fees)

अ.क्र.	शुल्काचे शीर्षक	शुल्क (रु.)
1.	नोंदणी शुल्क	200=00
2	माहितीपुस्तिका शुल्क	50=00
3.	पात्रता शुल्क	100=00
4.	ओळखपत्र शुल्क	10=00
5.	ई-सुविधा / ई -सर्विसिस शुल्क	70=00
6.	कुलपती ऑफीस इव्हेण्ट शुल्क	38=00
7.	स्पोर्ट शुल्क	50=00
8.	डी एस डब्लू शुल्क	50=00
9.	आपत्ती व्यवस्थापन शुल्क	10=00
10.	ग्रंथालय शुल्क	10=00
11.	एन.एस.एस. शुल्क	10=00
12.	संवाद शुल्क	10=00
13.	विद्यार्थी विमा शुल्क	20=00
	एकुण शुल्क	628=00

(ब) थेट द्वितीय वर्ष शुल्क

शिक्षण शुल्क (Tution Fees)	2300=00
परीक्षा शुल्क	1280=00
संवैधानिक शुल्क	628=00
श्रेयांक संक्रमण शुल्क	1500=00
एकूण शुल्क रुपये	5708=00

शुल्क भरण्यासंबंधी सूचना –

विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्रावर कोणतेही शुल्क जमा करावयाचे नाही. एकूण शिक्षणक्रम शुल्क रु. 5708/- विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने विद्यापीठाच्या अधिकृत बँक खात्यात जमा करावयाचे आहे. ऑनलाईन पद्धतीशिवाय अन्य कोणत्याही पद्धतीने रक्कम स्वीकारली जाणार नाही.

4. तृतीय वर्ष बी. कॉम.

4.1 अभ्यासक्रम

पुनर्रचित अभ्यासक्रम जून 2000 पासून सुरू करण्यात आला आहे. यात प्रथम वर्षास सक्तीचा 36 श्रेयांकांचा अधिष्ठान अभ्यासक्रम देण्यात आला आहे. 6 श्रेयांकांचा 1, या प्रमाणे 6 अभ्यासक्रम प्रथम वर्षास आहेत. द्वितीय वर्ष बी.कॉम. वर्गाचा पुनर्रचित अभ्यासक्रम जून 2001 पासून सुरू करण्यात आला आहे आणि तृतीय वर्ष बी.कॉम.चा अभ्यासक्रम जून 2003 पासून सुरू करण्यात आलेला आहे. पुनर्रचित द्वितीय वर्षाच्या अभ्यासक्रमात 5 अनिवार्य व 1 वैकल्पिक अभ्यासक्रम आहे. तर तृतीय वर्ष बी.कॉम.साठी 4 अनिवार्य आणि विशेषीकरणाच्या एका विषयाचे दोन अभ्यासक्रम आहेत. त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे –

तृतीय वर्ष बी.कॉम.	*संपर्कसत्रे*
(अ) अनिवार्य	
(1) (COM 209) हिशेबशास्त्र – भाग दोन	12
(2) (COM 220) भारतीय आर्थिक पर्यावरण	09
(3) (COM 221) परिव्यय अंकेक्षण आणि कर आकारणी	09
(4) (COM 222) मानवी संसाधन	09
(आ) विशेषीकरण (खालीलपैकी एका विषयाचे दोन पेपर्स)	
(1) (COM 306) बँकिंग व फायनान्स – 1	09
(2) (COM 307) बँकिंग व फायनान्स – 2	09
किंवा	
(3) (MGM 308) विपणन व्यवस्थापन – 1	09
(4) (MGM 309) विपणन व्यवस्थापन – 2	09

विशेष सूचना

द्वितीय/तृतीय वर्ष बी.कॉम. साठी प्रवेश-अर्ज भरताना माहिती-पुस्तिकेतील अभ्यासक्रमात (√) अशी खूण करावी. तसेच प्रवेश-अर्जात विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम संकेतांक व विषयाचे नाव लिहावे.

तृतीय वर्ष बी.कॉम. : अभ्यासक्रम

(COM 209) हिशेबशास्त्र – भाग दोन

पुस्तक पहिले : गुंतवणूक व कृषी लेखे

घटक 1 : गुंतवणूक लेखे

घटक 2 : भाडेखरेदी खरेदी पद्धती

घटक 3 : हप्तेबंद खरेदी पद्धती

घटक 4 : कृषी उद्योग लेखे –1

घटक 5 : कृषी उद्योग लेखे –2

पुस्तक दुसरे : प्रमंडळ लेखे

घटक 5 : प्रमंडळाचे लेखे – 1

घटक 6 : प्रमंडळाचे लेखे – 2

पुस्तक तिसरे : बँक व विमा प्रमंडळ लेखे

घटक 7 : बँक प्रमंडळ लेखे व अंतिम लेखे

घटक 8 : विमा प्रमंडळ लेखे – 1

घटक 9 : विमा प्रमंडळ लेखे – 2

घटक 10 : संगणकीकृत हिशेबशास्त्राची ओळख

(COM 220) भारतीय आर्थिक पर्यावरण

पुस्तक पहिले : आर्थिक पर्यावरण

घटक 1 : प्रास्ताविक – संकल्पना, घटक, पर्यावरणावर परिणाम करणारे घटक, पर्यावरणाचे प्रकार, पर्यावरण व्यवस्थापन, पर्यावरण-मानव व विकास

घटक 2 : आर्थिक पर्यावरणाचे महत्त्व, भारतीय नियोजनाचे पाच दशकांतील बदलते आर्थिक चित्र

घटक 3: वने, पाणी व ऊर्जा यांच्या विशेष संदर्भात भारतातील नैसर्गिक स्रोत (साधनसामग्री)

पुस्तक दुसरे : कृषी, उद्योग व सेवा क्षेत्र

घटक 4 : शेती – धारणा आकार, जमिनीचा वापर, पीक पद्धती, उत्पादकता, कृषी उत्पादन

घटक 5 : कारखाने – स्वातंत्र्योत्तर काळातील लघू, मध्यम आणि मोठ्या प्रमाणावरील उद्योगांचा औद्योगिक विकास,लघू व मध्यम उद्योगधंदे आणि त्यांच्या समस्यांबाबतीत शासनाचे धोरण

घटक 6 : पायाभूत सुविधांचा विकास

पुस्तक तिसरे : आर्थिक धोरण व नियोजन

घटक 7 : भारतातील आर्थिक धोरणे – नाणेविषयक, वित्तीय आणि परदेशी व्यापार, परदेश सहयोग व बहुराष्ट्रीय कंपन्यांची भूमिका

घटक 8 : औद्योगिक कामगारासंबंधी शासकीय धोरण, मालकी व व्यवस्थापनातील सहभाग, सार्वजनिक खर्च व सार्वजनिक कर्ज

घटक 9 : भारतीय नियोजन – वैशिष्ट्ये, पंचवार्षिक नियोजनाचे यश व अपयश – मानव संसाधन विकसन – धोरणे व कृती, राष्ट्रीय लोकसंख्या धोरण

(COM 221) परिव्यय, अंकेक्षण आणि कर आकारणी

पुस्तक पहिले : अंकेक्षण

घटक 1 : अंकेक्षण : व्याख्या, स्वरूप, उद्दिष्टे व फायदे

घटक 2 : जमखर्चातील चुका, अफरातफरी, लबाडीचे प्रकार

घटक 3 : अंकेक्षणाचे विविध प्रकार आणि वर्गीकरण

घटक 4 : अंकेक्षण कार्यक्रम, अंकेक्षण वही, अंतर्गत तपासणी व अंतर्गत अंकेक्षण

घटक 5 : तपासणी व प्रमाणन/पावती परीक्षण

घटक 6 : संपत्ती व देयतेचे सत्यापन आणि मुल्यांकन

घटक 7 : कंपनीचा अंकेक्षक : पात्रता, अपात्रता, नेमणूक

पुस्तक दुसरे : परिव्यय लेखांकन

घटक 7 : परिव्यय लेखांकन

घटक 8 : अर्थिक लेखे आणि परिव्यय लेखे यांची तुलना

घटक 9 : परिव्यय एकक आणि परिव्यय केंद्र

घटक 10 : परिव्ययाचे घटक आणि परिव्यय पत्रक

पुस्तक तिसरे : आयकर
घटक 11 : उत्पन्न कर कायदा 1961 : परिचय
घटक 12 : उत्पन्न कर कायद्यातील महत्त्वाच्या संकल्पना

(COM 222) मानवी संसाधन व्यवस्थापन

पुस्तक पहिले : मानव संसाधन
घटक 1 (अ) : अर्थ, व्याख्या व उद्देश
घटक 1 (आ) : महत्त्व व कार्ये
घटक 2 (अ) : संघटनेचा अर्थ, विकास व गुणधर्म
घटक 2 (आ) : संघटनेचे प्रकार व मूल्यमापन
घटक 3 (अ) : कार्यरचना, समृद्धी व तंत्रे
घटक 3 (आ) : कार्यविश्लेषण, गरज व प्रक्रिया
घटक 4 : कार्यवर्णन, स्पष्टता व नेमकेकरण
पुस्तक दुसरे : मानव संसाधन नियोजन
घटक 5 : मनुष्यबळ नियोजन
घटक 6 : कर्मचाऱ्यांची भरती
घटक 7 : कर्मचारी निवड : अर्थ, प्रक्रिया, निर्णय व मूल्यमापण
घटक 8 : परिचयसत्र व कार्यनिर्धारण
पुस्तक तिसरे : मानव संसाधन विकास
घटक 9 : प्रशिक्षण व विकास
घटक 10 : कार्यसिद्धी मूल्यमापन आणि कार्य मूल्यमापन

(COM 306) बँकिंग व फायनान्स – 1

पुस्तक पहिले : बँक व्यवसाय
घटक १: व्यापारी बँका अर्थ आणि कार्ये
घटक २ : बँक व्यवसायाची मूलतत्त्वे, पतपैशाची निर्मिती आणि बँकांचा ताळेबंद
घटक ३ : बँकेत खाते उघडणे आणि खात्यावरील व्यवहार
पुस्तक दुसरे : बँक व्यवसाय व कायदे
घटक १ : तारण म्हणून स्वीकारण्यात येणारी मालमत्ता आणि तारणाचे प्रकार
घटक २ : भारतातील व्यापारी बँकिंगच्या क्षेत्रातील सुधारणा
घटक ३ : बँकिंग व्यवसायाशी संबंधित कायदे
पुस्तक तिसरे : बँकांचे प्रकार
घटक १: प्रादेशिक ग्रामीण बँक
घटक २ : सहकारी बँका आणि खाजगी बँका
घटक ३ : भारतीय रिझर्व बँक

(COM 307) बँकिंग व फायनान्स – 2

पुस्तक १ : वित्तीय बाजार
घटक १ : नाणेबाजार
घटक २ : भांडवलबाजार
घटक ३ : विदेशी चलन बाजार
पुस्तक २ : वित्तीय संस्था – १
घटक १ : विकास बँक
घटक २ : आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था
पुस्तक ३ : वित्तीय संस्था – २
घटक १ : वित्तीय बाजाराशी निगडित संस्था
घटक २ : बँकेतर वित्तीय संस्था
घटक ३ : प्रकल्प मूल्यमापन आणि वसुली

(MGM 308) विपणन व्यवस्थापन – 1

पुस्तक पहिले : विपणन
घटक १ : बाजारपेठ आणि विपणन
घटक २ : विपणन पर्यावरण
घटक ३ : विपणन व्यवस्थापन आणि नियोजन
घटक ४ : बाजारपेठ विभक्तीकरण आणि लक्ष्य
पुस्तक दोन: विपणन मिश्र
घटक ५ : विपणन मिश्र
घटक ६ : सेवांचे विपणन
पुस्तक तिसरे : विपणन माहिती
घटक ७ : विपणन माहिती व्यवस्था
घटक ८ : विपणन संशोधन
घटक ९ : विपणन नियंत्रण

(MGM 309) विपणन व्यवस्थापन – 2

पुस्तक पहिले : जाहिरात
घटक १ : जाहिरात
घटक २ : जाहिरात मोहीम
घटक ३ जाहिरातीचे संघटन
पुस्तक दुसरे : विक्रय कला
घटक ४: विक्रय पूर्वानुमान
घटक ५ : विक्रयकला आणि विक्रयवृद्धी
घटक ६ : विक्रेता संच व्यवस्थापन
पुस्तक तिसरे : ग्राहक समाधान
घटक ७ (अ) : ग्राहक वर्तन
घटक ७ (आ) : संस्थात्मक खरेदीवर्तन
घटक ८ : ग्राहक समाधान व्यवस्थापन
घटक ९ : विपणन अंकेक्षण

4.2 प्रवेश–पात्रता

खालीलपैकी कोणतीही एक पात्रता पूर्ण असणाऱ्या व्यक्ती

य.च.म.मुक्त विद्यापीठात यापूर्वी द्वितीय वर्षात (बी.कॉम.) प्रवेश घेतलेले सर्व विद्यार्थी

4.3 शिक्षणक्रम शुल्क

तृतीय वर्ष एकूण शुल्क रु. 4458/- (चार हजार चारशे अठ्ठावन्न मात्र) आहे. त्याची विगतवारी पुढीलप्रमाणे–

विद्यापीठ शुल्क	रु. 3578=00
अभ्यासकेंद्र शुल्क	रु. 880 =00
एकूण शिक्षणक्रम शुल्क	रु. 4458=00

(अ) संवैधानिक शुल्क (Mandatory Fees)

अ.क्र.	शुल्काचे शीर्षक	शुल्क (रु.)
1.	नोंदणी शुल्क	200=00
2	माहितीपुस्तिका शुल्क	50=00
3.	पदवी दान प्रमाणपत्र शुल्क	450=00
4.	अलूम्नी शुल्क	10=00
5.	ई-सुविधा / ई -सर्विसिस शुल्क	70=00
6.	कुलपती ऑफीस इन्हेण्ट शुल्क	38=00
7.	स्पोर्ट शुल्क	50=00
8.	डी एसडब्लू शुल्क	50=00
9.	आपत्ती व्यवस्थापन शुल्क	10=00
10.	ग्रंथालय शुल्क	10=00
11.	एन एस एस शुल्क	10=00
12.	संवाद शुल्क	10=00
13.	विद्यार्थी विमा शुल्क	20=00
	एकुण शुल्क	978=00

(ब) तृतीय वर्ष शुल्क

शिक्षण शुल्क (Tution Fees)	2400=00
परीक्षा शुल्क	1080=00
संवैधानिक शुल्क	978=00
एकूण शुल्क रुपये	4458=00

शुल्क भरण्यासंबंधी सूचना –

विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्रावर कोणतेही शुल्क जमा करावयाचे नाही. एकूण शिक्षणक्रम शुल्क रु. 4458/- विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने विद्यापीठाच्या अधिकृत बँक खात्यात जमा करावयाचे आहे. ऑनलाईन पद्धतीशिवाय अन्य कोणत्याही पद्धतीने रक्कम स्वीकारली जाणार नाही.

महत्त्वाच्या सूचना :

1. विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयानुसार अंध व तृतीयपंथी विद्यार्थी तसेच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य यांना नाममात्र नोंदणीशुल्क रु.200/- भरून प्रवेश घेता येईल.
2. विद्यार्थ्यास प्रवेश रद्द करून शुल्क परत हवे असल्यास विद्यार्थ्याने प्रवेशाच्या अंतिम दिनांकापर्यंत प्रवेश रद्द करून शुल्क परत मिळणेबाबतचा अर्ज करावा. तसेच शुल्क परताव्यासाठी विद्यार्थ्याने विनंती अर्जासोबत त्याचे स्वत:चे बँक पासबुक, शुल्क भरल्याची पावती व प्रवेश अर्जाची प्रत पाठवावी. प्रवेश प्रक्रिया संपुष्टात आल्यानंतर विद्यार्थ्याने अर्ज केल्यास फी परताव्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) चे नियम लागू होतील.
3. एकदा प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्यास कुठल्याही परिस्थितीत अभ्यासकेंद्र बदलून देता येणार नाही.
4. विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) च्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रवेशाच्या अंतिम दिनांकानंतर कोणतेही प्रवेश केले जाणार नाहीत.

4.4 मूल्यमापन प्रक्रिया

अंतर्गत मूल्यमापन

- अंतर्गत मूल्यमापनात प्रत्येक अभ्यासक्रमासाठी २० गुणांचा गृहपाठ देण्यात येईल. प्रत्येकी ५ गुणांचे ४ प्रश्न असतील.
- गृहपाठाचे प्रश्न विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घ्यावेत आणि ते सोडवून अध्ययन सहाय्यता केंद्रावर जमा करावेत.
- प्रत्येक अभ्यासक्रमाच्या गृहपाठासाठी प्रत्येकी ५ गुणांचे ४ प्रश्न सोडवावयाचे असतील. अंतर्गत मूल्यमापनासाठीचे (गृहपाठाचे) प्रश्न अध्ययनार्थींनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घ्यायचे आहेत. अंतर्गत मूल्यमापनाअंतर्गत २० पैकी मिळालेले गुण गुणपत्रिकेत स्वतंत्रपणे (CA) दर्शविण्यात येतील. तसेच हे गुण अंतिम परीक्षेत मिळालेल्यागुणांत मिसळून गुणपत्रिकेत एकत्रितपणे दर्शविण्यात येतील.
- **द्वितीय व तृतीय वर्ष बी.कॉम :** अंतर्गत मूल्यमापनात उत्तीर्ण होण्याकरिता किमान गुणांची अट नसेल. तसेच गृहपाठ हे विद्यार्थ्यांनी ज्या शैक्षणिक वर्षाला प्रवेश घेतला आहे त्या वर्षामध्ये एकदाच स्वीकारले जातील. प्रत्येक अभ्यासक्रमास विद्यार्थ्याने उत्तीर्ण होण्यासाठी अंतिम मूल्यमापनात ४०% गुण व अंतर्गत व अंतिम मुल्यमापनामध्ये एकत्रित ४०% गुण प्राप्त करणे अनिवार्य आहे.
- अंतर्गत मूल्यमापन व अंतिम मूल्यमापनात प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे अंतिम निकाल जाहीर करण्यात येईल.

अंतिम मूल्यमापन

- प्रत्येक वर्षाच्या सहा अभ्यासक्रमांसाठी ६ प्रश्नपत्रिका असतील. प्रत्येक अभ्यासक्रमात ८० गुणांची ३ तास वेळ असणारी अंतिम परीक्षा असेल. प्रत्येक प्रश्नपत्रिकेत २० गुणांचे चार प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नात प्रत्येकी ५ गुणांचे पाच उपप्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नातील पाचपैकी चार उपप्रश्न सोडवावयाचे असतील.
- अंतिम मूल्यमापन प्रत्येक अभ्यासक्रमात उत्तीर्ण होण्यासाठी ८० पैकी किमान ३२ गुण मिळवणे अनिवार्य असेल. प्रत्येक अभ्यासक्रमात ८० पैकी मिळालेले गुण गुणपत्रिकेत (University Assessment-UA) स्वतंत्रपणे दर्शविण्यात येतील. प्रत्येक अभ्यासक्रमात उत्तीर्ण होण्याकरिता अंतर्गत आणि अंतिम मूल्यमापन एकत्रित किमान ४० गुण मिळविणे अनिवार्य असेल.
- अंतर्गत मूल्यमापन मिळालेले गुण व अंतिम परीक्षेत मिळालेले गुण गुणपत्रिकेत स्वतंत्रपणे दर्शविण्यात येतील. अंतर्गत मूल्यमापन व अंतिम मूल्यमापन प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे आणि श्रेणी (Class) देण्यात येईल.
- पर्यावरण अभ्यास (EVS 201) या अनिवार्य अभ्यासक्रमाची परीक्षा विद्यार्थ्यांना द्यावी लागेल. या अभ्यासक्रमाकरिता ८० गुणांसाठी परीक्षा असेल, तर २० गुण हे क्षेत्रीय कार्यासाठी असतील. हा अभ्यासक्रम पूर्ण करण्याकरिता १०० पैकी एकत्रित ४० गुण मिळवणे आवश्यक आहे. मात्र या अभ्यासक्रमाचे गुण शिक्षणक्रमाची अंतिम श्रेणी ठरविताना ग्राह्य धरले जाणार नाहीत.

पुन:परीक्षार्थीसाठी सूचना

- जे विद्यार्थी एका किंवा अनेक विषयांत अनुत्तीर्ण/ अनुपस्थित राहिल्यास त्यांना पुढील परिक्षा सत्रांत पुन:परीक्षार्थी अर्ज व शुल्क भरून विषय उत्तीर्ण करता येतील. सदर शुल्क खालीलप्रमाणे

अ.क्र.	तपशील	शिक्षणक्रम शुल्क
१	प्रमाणपत्र/पदविका/पदवी (व्यावसायिक/तांत्रिक/सायन्स वगळून)	रु. १८० प्रती पेपर
२	पदव्युत्तर पदवी आणि सर्व शिक्षणक्रम पदवी व्यावसायिक/तांत्रिक/सायन्सचे सर्व शिक्षणक्रम लेखी परीक्षा	रु. २०० प्रती पेपर
३	प्रात्यक्षिक/ मौखिक परीक्षा (viva-voce)	
	प्रात्यक्षिक/स्टुडीओ वर्क /टर्म वर्क-	रु. २२०
	प्रकल्प / मौखिक -	रु. ३३०
४	मार्कशीट शुल्क	रु. १००
५	विलंब शुल्क	रु. १००
६	अतिविलंब शुल्क	रु. ५००

सूचना : सदर परीक्षा पुनःपरीक्षा शुल्कात विद्यापीठाच्या निर्णयानुसार बदल होऊ शकतो.

५. Academic Bank of Credits ID तयार करण्याबाबतची सूचना

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार आपणास Academic Bank of Credits ID तयार करणे अनिवार्य आहे. आपण प्राप्त केलेले प्रमाणपत्र, पदविका, पदवीची माहिती Digi Locker (ABC-NAD) वर भरावी लागणार आहे. त्याशिवाय इतर अभ्यासक्रमासाठी क्रेडीट ट्रान्सफर करता येणार नाही. आपणास Academic Bank of Credits ID नोंदणी http://www.abc.gov.in या पोर्टलवर करता येईल किंवा आपल्या विद्यापीठाच्या www.ycmou.ac.in या वेबसाइटला भेट द्या. या वेबसाइटवरील student zone या बटनला क्लिक करा. यातील Academic Bank of Credits ID वर क्लिक केल्यानंतर Academic Bank of Credits ID तयार करण्यासंबंधित माहिती व PPT सादरीकरण आपणासाठी वेबसाइटवर उपलब्ध केलेले आहे.

महत्वाची सूचना –१ : द्वितीय आणि तृतीय वर्षाला प्रवेशीत झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना छापील अध्ययन साहित्य परिक्षेपूर्वीच आपापल्या अभ्यास केंद्रावरून घेऊन जावे. निकाल जाहीर झाल्यानंतर अध्ययन साहित्य नेलेले नसल्यास त्यावर विद्यार्थ्याचा हक्क असणार नाही.

सूचना –२ : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), इतर मागासवर्ग (OBC), विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT), विशेष मागास प्रवर्ग (SBC) व आर्थिक दुर्बल घटक (EWS) या प्रवर्गातील/घटकातील विद्यार्थ्यांना शासनाच्या Post Matric Scholarship Schemes (शिष्यवृत्ती योजना) लागू आहेत. शिष्यवृत्ती संदर्भातील सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर शिष्यवृत्ती Tab मध्ये दिलेली आहे. विद्यार्थ्यांनी सदर माहिती काळजीपूर्व वाचून प्रवेश अर्ज भरताना शिष्यवृत्ती पर्यायाची निवड करायची आहे. शिष्यवृत्ती पर्याय स्वीकारून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेतल्यानंतर शासनाच्या महाडीबीटी संकेतस्थळावरून ऑनलाईफ़ँ शिष्यवृत्ती अर्ज भरणे बंधनकारक आहे.

६. नोंदणी प्रक्रिया

(1) विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने निर्धारित केलेल्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेप्रमाणे नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी.

(2) ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मिळालेली पावती अभ्यासकेंद्रावर दाखवून आपला प्रवेश निश्चित करावा.

७. सायबर सिक्युरिटी अभ्यासक्रम (UG) मराठी CSC102

घटक	*तपशील*
कोर्सचे नाव	सायबर सिक्युरिटी अभ्यासक्रम (UG)
अभ्यासक्रम संकेतांक	CSC102
अभ्यासपद्धती	ऑनलाईन - LMS आधारित (स्वअभ्यास घटक व मूल्यमापन)
भाषा	मराठी
लक्ष्य समूह	सर्व शाखांतील पदवीपूर्व विद्यार्थी
मूल्यमापन पद्धत	CA : १५ गुण UA : ३५ गुण
एकूण गुण	५०
अंतिम परीक्षा	LMS वर ऑनलाईन MCQ स्वरूपात (Multiple Attempts)
पोर्टल लिंक	https://cs.ycmouonline.ac.in/
लॉगिन माहिती	User ID : विद्यार्थी PRN क्रमांक Password : cs123
कोर्सची उद्दिष्टे	१. सायबर सुरक्षेच्या मूलभूत संकल्पनांची ओळख करून देणे. २. सायबर गुन्हे व त्यावरील कायदेशीर उपाय समजावून देणे. ३. सोशल मीडिया व डिजिटल व्यवहार सुरक्षित करण्याबाबत जागरूकता निर्माण करणे.
अपेक्षित परिणाम (Course Outcomes)	१. सायबर सुरक्षेचे मूलभूत ज्ञान प्राप्त होईल. २. सायबर गुन्हे ओळखण्याची क्षमता विकसित होईल. ३. सुरक्षित डिजिटल वर्तन अंगीकारता येईल. ४. संगणक व मोबाईल उपकरणांचे संरक्षण करता येईल.
अभ्यासक्रम सुरू करण्याची पद्धत Course Access Proceduree	१. https://cs.ycmouonline.ac.in/ या पोर्टलला भेट द्या. २. झठछ क्रमांक व पासवर्ड (cs123) टाकून लॉगिन करा. ३. पहिल्यांदा लॉगिन केल्यानंतर नवीन पासवर्ड सेट करा. ४. Continue-My Courses या पर्यायावर क्लिक करा. ५. Cyber Security Course उघडा व अभ्यास सुरू करा.
महत्त्वाच्या सूचना	अंतिम परीक्षेपूर्वी कोर्स पूर्ण करणे अनिवार्य इंटरनेट आवश्यक मोबाईल: किमान 4G लॅपटॉप/डेस्कटॉप: 600 Kbps

पदवी (Undergraduate) स्तरावरील
सायबर सुरक्षा अभ्यासक्रम
Course Name - Cyber Security Course (UG)
Marathi - Course Code - CSC102

मॉड्यूल–I : सायबर सुरक्षेची ओळख

विषय सामग्री : सायबर अवकाशाची व्याख्या व संगणक व वेब तंत्रज्ञानाचा आढावा, सायबर अवकाशाची रचना, संवाद व वेब तंत्रज्ञान, इंटरनेट, वर्ल्ड वाइड वेब, इंटरनेटचा उदय, डेटा हस्तांतरण व प्रशासनासाठी इंटरनेट पायाभूत सुविधा, इंटरनेट सोसायटी, सायबर अवकाशाचे नियमन, सायबर सुरक्षेची संकल्पना, सायबर सुरक्षेशी संबंधित समस्या व आव्हाने.

अध्ययन निष्पत्ती (Learning Outcomes) : या घटकाच्या पूर्णतेनंतर विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेची संकल्पना तसेच त्यासंबंधित समस्या व आव्हाने समजतील.

मॉड्यूल–II : सायबर गुन्हे व सायबर कायदा

विषय सामग्री : सायबर गुन्ह्यांचे वर्गीकरण, सामान्य सायबर गुन्हे संगणक व मोबाईलवर होणारे गुन्हे, महिला व बालकांविरुद्ध सायबर गुन्हे, आर्थिक फसवणूक, सोशल इंजिनिअरिंग हल्ले, मालवेअर व रॅन्समवेअर हल्ले, झिरो–डे व झिरो–क्लिक हल्ले, सायबर गुन्हेगारांची कार्यपद्धती, सायबर गुन्ह्यांची तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया, प्रतिबंधात्मक व सुधारात्मक उपाययोजना, सायबर गुन्ह्यांचा कायदेशीर दृष्टिकोन, माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० व त्यातील दुरुस्त्या, भारतातील सायबर गुन्हे व सायबर सुरक्षा संबंधित संस्था, प्रकरण अभ्यास (Case Studies).

अध्ययन निष्पत्ती (Learning Outcomes): या घटकाच्या शेवटी विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांचे स्वरूप, कायदेशीर उपाय व उपलब्ध यंत्रणांद्वारे तक्रार कशी नोंदवायची हे समजेल.

प्रात्यक्षिक :

१. फिशिंग ई–मेलची तक्रार नोंदविणे
२. ई–मेल फिशिंग हल्ल्याचे प्रात्यक्षिक व प्रतिबंधात्मक उपाय

मॉड्यूल–III : सोशल मीडिया–आढावा व सुरक्षा

विषय सामग्री : सोशल नेटवर्कची ओळख, सोशल मीडियाचे प्रकार, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स, सोशल मीडिया मॉनिटरिंग, हॅशटॅग, व्हायरल कंटेंट, सोशल मीडिया मार्केटिंग, सोशल मीडिया गोपनीयता, ऑनलाईन सोशल नेटवर्कमधील आव्हाने, संधी व धोके, सोशल मीडियाशी संबंधित सुरक्षा समस्या, अयोग्य मजकूर रिपोर्ट करणे, अयोग्य मजकूर पोस्ट करण्यासंबंधी कायदे, सोशल मीडियाच्या वापरासाठी सर्वोत्तम पद्धती, प्रकरण अभ्यास.

अध्ययन निष्पत्ती (Learning Outcomes): विद्यार्थ्यांना सोशल मीडियावरील गोपनीयता व सुरक्षेशी संबंधित मुद्दे, रिपोर्टिंग प्रक्रिया, कायदेशीर बाबी व योग्य वापर पद्धती समजतील.

प्रात्यक्षिक :

१. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील गैरवापर व उल्लंघनासाठी तक्रार निवारण यंत्रणा

मॉड्यूल–IV : ई–कॉमर्स व डिजिटल पेमेंट्स

विषय सामग्री : ई–कॉमर्सची व्याख्या, ई–कॉमर्सचे घटक, ई–कॉमर्स सुरक्षा घटक, ई–कॉमर्सवरील धोके, ई–कॉमर्स सुरक्षेतील सर्वोत्तम पद्धती, डिजिटल पेमेंट्सची ओळख, डिजिटल पेमेंट्सचे घटक व हितधारक, डिजिटल पेमेंट्सचे प्रकार बँकिंग कार्ड्स, UPI, ई–वॉलेट्स, USSD, आधार आधारित पेमेंट्स, डिजिटल पेमेंट्समधील सामान्य फसवणूक व प्रतिबंधात्मक उपाय, डिजिटल पेमेंट्ससाठी RBI मार्गदर्शक तत्त्वे, पेमेंट अँड सेटलमेंट ॲक्ट २००७ मधील संबंधित तरतुदी.

अध्ययन निष्पत्ती (Learning Outcomes): विद्यार्थ्यांना ई–कॉमर्स व डिजिटल पेमेंट्सच्या मूलभूत संकल्पना, विविध डिजिटल पेमेंट पद्धती, संबंधित सायबर सुरक्षा बाबी व फसवणूक प्रतिबंधक उपाय समजतील.

प्रात्यक्षिक :

१. मोबाईल वॉलेट्स व णझख मधील सुरक्षा सेटिंग्ज संरचीत करणे

मॉड्यूल–V : डिजिटल उपकरण सुरक्षा, सायबर सुरक्षेसाठी साधने व तंत्रज्ञान

विषय सामग्री : एंड–पॉईंट डिव्हाइस व मोबाईल फोन सुरक्षा, पासवर्ड धोरण, सुरक्षा पॅच व्यवस्थापन, डेटा बॅकअप, थर्ड पार्टी सॉफ्टवेअर व्यवस्थापन, डिव्हाइस सुरक्षा धोरण, सायबर सुरक्षा सर्वोत्तम पद्धती, होस्ट फायरवॉल व अँटी–व्हायरसचे महत्त्व, Wi-Fi सुरक्षा, मूलभूत सुरक्षा धोरणे व परवानग्यांचे संरचन.

अध्ययन निष्पत्ती (Learning Outcomes): विद्यार्थ्यांना संगणक व मोबाईलशी संबंधित मूलभूत सुरक्षा बाबी व उपकरणांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक साधने व तंत्रज्ञान वापरण्याची क्षमता मिळेल.

प्रात्यक्षिक :

१. संगणकातील तीन स्तरावरील पासवर्ड धोरणे (BIOS, Administrator, Standard User)
२. संगणक व मोबाईलमध्ये सुरक्षा पॅच अपडेट्स
३. मोबाईल ॲप परवानग्यांचे व्यवस्थापन
४. अँटी–व्हायरसची स्थापना व संरचना
५. होस्ट फायरवॉलची स्थापना व संरचना

8. विभागीय केंद्रे

(1)अमरावती : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे अमरावती विभागीय केंद्र, व्ही.एम.व्ही. ते वलगाव रोड, पोस्ट व्ही.एम.व्ही. अमरावती - 444 604
☎ : (0721) 2531445 / 2531210
फॅक्स : (0721) 2531444

(2)औरंगाबाद : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे औरंगाबाद विभागीय केंद्र सर्व्हे नं. 41, सैनिकी मुलांच्या वसतिगृहाच्या पूर्वेस नंदनवन कॉलनी, छावणी,औरंगाबाद - 431 002
☎: (0240) 2371077 / 2371066
फॅक्स : (0240) 2371088

(3)मुंबई : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे मुंबई विभागीय केंद्र द्वारा : जगन्नाश शंकरशेठ म.न.पा.ची मराठी शाळा, दुसरा मजला, फ्रेअर ब्रीज (साऊथ) नाना चौक, ग्रँट रोड (प.), मुंबई - 400 007
☎: (022) 23874180 / 23874183 / 23874177 फॅक्स : (022) 23874187

(4)नागपूर : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नागपूर विभागीय केंद्र रावबहादूर डी., लक्ष्मीनारायण बंगला विद्यापीठ क्रीडा परिसर, लॉ कॉलेज कँपस रविनगर चौक, नागपूर - 440 001
☎: (0712) 2553724 /25
फॅक्स : (0712) 2553725

(5)नाशिक : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नाशिक विभागीय केंद्र, नाशिक महानगरपालिकेची जुनी इमारत, दुसरा मजला नवीन पंडित कॉलनी, नाशिक -422 002
☎ : (0253) 2317063
फॅक्स : (0253) 2576756

(6)पुणे : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे पुणे विभागीय केंद्र शाहीर अण्णाभाऊ साठे प्रशालागृह, महापालिका शाळा क्र.5 (मुलांची), 654, सदाशिव पेठ हौदासमोर, कुमठेकर मार्ग, पुणे -411 030
☎: (020)24457914 फॅक्स : (020) 24491107

(7) कोल्हापूर: य.च.म.मुक्त विद्यापीठाचे कोल्हापूर विभागीय केंद्र शिवाजी विद्यापीठ परिसर पोस्ट ऑफीसजवळ विद्यानगर, कोल्हापूर - 416 004
☎ : (0231) 2607022 फॅक्स : (0231) 2607023

(8) नांदेड : य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नांदेड विभागीय केंद्र स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ क्रीडा इमारत नांदेड - 421 606
☎ : (02462) 229940 / 283038
फॅक्स : (02462) 229950

9. विशेष सूचना / संपर्कासाठी

(अ) प्रवेश-अर्ज भरण्यासंबंधीच्या सूचना

01. प्रवेश-अर्ज भरण्यापूर्वी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेली माहितीपुस्तिका वाचावी.

02. प्रवेश-अर्जातील सर्व माहिती पूर्ण भरावी.

03. मुदतीनंतर आलेल्या प्रवेश-अर्जांचा विचार केला जाणार नाही.

04. विद्यापीठाकडून मिळालेले ओळखपत्र हरविल्यास रु. 15 आणि गुणपत्रक हरविल्यास रु. 50 (एकत्रित गुणपत्रक रु. 100/-) भरून दुसरी प्रत मिळेल. त्यासाठी शुल्काबरोबर आपले नाव, नोंदणी क्रमांक, वर्ग व अभ्यासकेंद्र ही माहिती कळविणे आवश्यक आहे. ही रक्कम डी.डी.ने पाठवावी. गुणपत्रकासाठी रु. 50/- अथवा रु. 100/- च्या बॉण्ड पेपरवर प्रतिज्ञापत्र (Affidavit) सादर करणे आवश्यक आहे.

